मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | रविवार, दि. 24 नोव्हेंबर 2024 | पान- 1

# भाजपच्या आमदार महेश लांडगेंची हॅट्रिक

## अजित गव्हाणेंचा केला पराभव : भाजपा कार्यकर्त्यांमध्ये एकच जल्लोष

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघामधून आमदार महेश लांडगे यांनी हॅट्रिक केली आहे. महेश लांडगे यांनी सलग तिसऱ्यांदा आमदार होण्याचा बहुमान मिळवला आहे. महेश लांडगे यांच्यासमोर महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांचे आव्हान होतं. भोसरी विधानसभा मतदारसंघात तुतारी वाजणार अशी चर्चा असताना महेश लांडगे विजय झाल्याने भाजपा कार्यकर्त्यांमध्ये जल्लोषाचे वातावरण आहे.



भोसरी विधानसभा मतदारसंघात महेश लांडगे विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे अशी लढत होती. भोसरी विधानसभेच्या या आखाड्यात महेश लांडगे यांनी अजित गव्हाणे यांना चितपट केलं आहे. अजित पवार गटातून शरद पवार गटात अजित गव्हाणे यांनी प्रवेश केला होता. एक महिना अगोदर अजित गव्हाणे यांनी जोरदार प्रचार देखील सुरू केला होता. मात्र, त्यांचा महेश लांडगे यांच्यासमोर निभाव लागला नाही. अजित गव्हाणे यांनी वारंवार आरोप- प्रत्यारोप केले त्याचा फायदा त्यांना होऊ शकला नाही. अजित गव्हाणेंसाठी शरद पवार देखील भोसरीच्या मैदानात उतरले तर दुसरीकडे महेश लांडगे यांच्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची जाहीर सभा झाली. "बटेंगे गे तो कटेंगे, एक है तो सेफ है" असा नारा उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता, याचा देखील फायदा महेश लांडगे यांना झाला.

---

# भाजपचे शंकर जगताप 1 लाख, तर सुनील शेळके 1 लाख 8 हजारांच्या मताधिक्याने विजयी

## भाजपचे शंकर जगताप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके लाखांच्या मताधिक्याने विजयी झालेले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

भाजपचे शंकर जगताप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके लाखांच्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. चिंचवड च्या जनतेने शंकर जगताप यांना १ लाख ३ हजार आणि मावळ च्या जनतेने आमदार सुनील शेळके यांना १ लाख ८ हजार मताधिक्याने विजयी केले आहे. मावळ विधानसभा मतदारसंघ हा लक्षवेधी ठरला. मावळ विधानसभा निवडणुक एकतर्फी झाल्याचे पाहायला मिळालं. चिंचवड विधानसभा मतदार संघाची ही परिस्थिती



काही वेगळी नाही.

चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये भाजपचे शंकर जगताप विरुद्ध शरद पवार गटाचे राहुल कलाटे अशी थेट लढत होती. राहुल कलाटे यांच्यासाठी खासदार अमोल कोल्हे यांनी कंबर कसली. मित्र राहुल कलाटे यांच्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला होता. त्याचबरोबर शरद पवार यांचा रोड -शो देखील घेण्यात आला होता. तरीदेखील चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी राहुल कलाटे यांना नाकारत भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना विजयी केलं.

एक लाख तीन हजारांचे मताधिक्य मिळवून दिलं. दुसरीकडे मावळ विधानसभा मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सुनील शेळके यांच्या पुढे त्यांच्याच पक्षातील बंडखोर बापू भेगडे यांच आव्हान होतं. भेगडे यांना भाजपमधून माजी राज्यमंत्री बाळ भेगडे यांनी पाठिंबा दिला होता. मावळ मधील अवघी भाजप शेळके यांच्या विरोधात होती. असं असताना सुनील शेळके यांनी बाजी मारली. मावळ मधील जनतेने सुनील शेळके यांना एक लाख आठ हजारांच्या मताधिक्याने विजयी केल आहे. मावळ मधील लक्षवेधी ठरलेल्या या विधानसभेच्या लढतीकडे सर्वांचे लक्ष होतं. एकूणच चिंचवड आणि मावळ मधील दोन्ही महायुतीच्या उमेदवारांनी लाखांचा पल्लागाठत विजयश्री खेचून आणली आहे.

# शिवाजीनगरमध्ये भाजपचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांच्या मताधिक्यात मोठी वाढ

**शिवाजीनगर मतदारसंघात महायुतीकडून भारतीय जनता पक्षाचे सिद्धार्थ शिरोळे, महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे दत्ता बहिरट यांच्यात प्रमुख लढत होती.**

**पुणे | प्रतिनिधी**

शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी ३६ हजार ७०२ मतांनी विजय मिळवला. या मतदारसंघात वाढलेल्या मतटक्क्याचे लाभार्थी सिद्धार्थ शिरोळेच ठरल्याचे दिसून येत आहे. लाडकी बहीण योजना, मतदारांशी साधलेला संपर्क, केलेली विकासकामे अशा कारणांमुळे शिरोळे यांचे २०१९च्या निवडणुकीच्या तुलनेत मताधिक्य मोठ्या प्रमाणात वाढले आहे.



### ठळक वैशिष्ट्ये

- मतदारसंघात वाढलेले मतदान
- काँग्रेसमधील बंडखोरीचा फारसा परिणाम नाही
- झोपडपट्टी भागातील विकासकामे, लाडकी बहीण योजना पथ्यावर – मतदारसंघातील भाजपची ताकत स्पष्ट

शिवाजीनगर मतदारसंघात महायुतीकडून भारतीय जनता पक्षाचे सिद्धार्थ शिरोळे, महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे दत्ता बहिरट यांच्यात प्रमुख लढत होती. काँग्रेसचे मनीष आनंद यांनी बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढवली. निकालात सिद्धार्थ शिरोळे यांनी ८४ हजार ६९५ मतांसह ३६ हजार ७०२ मतांनी विजय मिळवला. काँग्रेसचे दत्ता बहिरट यांना ४७ हजार ९९३ मते मिळाली. मनीष आनंद यांना १३ हजार ६१ मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे परेश सिरसांगे यांना २ हजार २४४, बहुजन समाज पक्षाचे लतीफ शेख यांना ८४६ मते मिळवता आली. या मतदारसंघात यंदा सुमारे सात टक्के मतदान वाढले होते. सिद्धार्थ शिरोळे २०१९मध्ये सुमारे पाच हजार मतांनी विजयी झाले होते.

मनीष आनंद यांच्या बंडखोरीचा फटका दत्ता बहिरट यांना बसण्याची शक्यता वर्तवली जात होती. आनंद यांनी काही हजार मते मिळवली असली, तरी आनंद यांनी मिळवलेल्या मतांपेक्षा शिरोळे यांचे मताधिक्य जास्त आहे. त्यामुळे आनंद यांच्या या बंडखोरीचा फटका बहिरट यांना बसल्याचे दिसून येत नाही. मात्र, ही बंडखोरी पथ्यावर पडून शिरोळे यांना मोठे मताधिक्य मिळवणे सुकर झाल्याचे दिसून येत आहे.\

माझ्यावर विश्वास दाखवून मला पुन्हा संधी दिल्याबद्दल मतदारांचे आभार. हा विजय केवळ माझा नाही, तर प्रत्येक मतदार, अव्याहतपणे काम केलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा आहे. या विजयाने जबाबदारीचीही जाणीव करून दिली आहे. आता अधिक काम करून शिवाजीनगर विकास आणि समृद्धतेचे प्रारूप म्हणून विकसित करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, अशी भावना भाजपचे सिद्धार्थ शिरोळे यांनी व्यक्त केली.

# 'ईव्हीएम'विरोधात सर्वोच्च न्यायालयात; पराभवानंतर वडगाव शेरीतील उमेदवार आक्रमक

**ईव्हीएम यंत्रणेसंबंधी तक्रारींबाबत सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार असे डॉ. हुलगेश चलवादींनी सांगितले.**

**पुणे | प्रतिनिधी**

पोर्शे कार अपघात प्रकरणामुळे राज्यभरात चर्चेत आलेल्या वडगाव शेरी मतदार संघात झालेल्या अटीतटीच्या लढाईत राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार आणि विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांचा पराभव झाला. या मतदारसंघातून राष्ट्रवादी ( शरद पवार) पक्षाचे उमेदवार बापू पठारे विजयी झाले आहेत. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासून वडगाव शेरी मतदारसंघतातून विद्यमान आमदार सुनील टिंगरे आघाडीवर होते. पंधरा हजारांचे मताधिक्य मिळवित टिंगरे आघाडीवर असताना अचानकपणे बापू पठारे यांनी त्यांचे मताधिक्य तोडून आघाडी घेतली. या मतदारसंघातून बहुजन समाज पक्षाकडून हुलगेश चलवादी



### चलवादींना मिळाली इतकी मते

- मतदारसंघात पहिल्या तीन उमेदवारांमध्ये डॉ.चलवादींची चर्चा होती. असे असतांना त्यांना केवळ ३ हजार ७६२ मतं मिळाली आहे. यावर चलवादी यांनी नाराजी व्यक्त केली असून ईव्हीएम यंत्रणेत घोळ झाल्याचा संशय डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला आहे. वडागाव शेरी मतदार संघातील सर्व जनता ठामपणे पाठिशी उभी असतांना देखील प्रत्यक्षात मिळालेली मतं बघता हा निकाल जनतेचा नाही, तर भ्रष्ट ईव्हीएमचा असल्याचा दावा त्यांनी केला. यामुळे मतपत्रावर निवडणूक होणे आवश्यक आहे. जेणेकरून मतदारांचे खर मत कुणाला हे कळत.आता ईव्हीएम विरोधात अधिक तीव्र आंदोलन उभारू असे,डॉ.चलवादी म्हणाले.

निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. या मतदारसंघात लागलेला निकाल धक्कादायक आहे.

५० हजारांहून अधिकची हक्काची मतं असून देखील तेवढीही मतं न मिळाल्याने ईव्हीएम यंत्रणेत घोळ असल्याचा आरोप वडगाव शेरी मतदार संघातील बहुजन समाज पक्षाचे उमेदवार डॉ.हुलगेश चलवादी यांनी केला. ईव्हीएम यंत्रणेसंबंधी अनेक तक्रारी असून देखील त्यावरच निवडणूकीचे चक्र अवलंबून असल्याने आता याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असून लवकरच जनहित याचिका न्यायालयात दाखल करणार असल्याचे चलवादींनी सांगितले.

प्रस्थापित पक्षांनी यावेळी मतदार संघात पैशांचे अमाप वाटप केल्याने हा धनबलाचा आणि ईव्हीएमचा कौल आहे; जनमताचा नाही. वडगाव शेरी मतदार संघात जवळपास १५० कोटींचे वाटप झाल्याचा धक्कादायक आरोप देखील त्यांनी यावेळी केला.मतदार संघात दलित, मागासवर्गीय, ओबीसी, अल्पसंख्याक मतदारांची मोठी संख्या आहे. ही सर्व मतदार बहुजन समाज पक्षांच्या बाजूने कौल देतात. यंदा मतदारसंघात बसपाचे वारे होते. विविध वस्त्यांमध्ये, सोसायटी,परिसरात बसपचीच चर्चा होती. चलवादी यांनी नाराजी व्यक्त केली असून ईव्हीएम यंत्रणेत घोळ झाल्याचा संशय डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला आहे. वडागाव शेरी मतदार संघातील सर्व जनता ठामपणे पाठिशी उभी असतांना देखील प्रत्यक्षात मिळालेली मतं बघता हा निकाल जनतेचा नाही, तर भ्रष्ट ईव्हीएमचा असल्याचा दावा त्यांनी केला. यामुळे मतपत्रावर निवडणूक होणे आवश्यक आहे.

# आचारसंहिता काळात जिल्ह्यात 7 कोटींची जप्ती

## राज्यात सर्वाधिक 7 कोटी 63 लाख 34 हजार रुपयाहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त जप्त करण्यात आला आहे,

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने राज्यात सर्वाधिक ७ कोटी ६३ लाख ३४ हजार रुपयाहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे. संपूर्ण राज्यातील सुमारे २५ टक्के जप्तीची कारवाई पुणे जिल्ह्यात झाली असून उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉ. दिवसे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पुणे जिल्ह्याचे अधीक्षक चरणसिंह राजपूत यांचे अभिनंदन केले आहे.



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून विविध पथके तयार करण्यात आली. या पथकांनी केलेल्या कारवाईत १ हजार १०० गुन्हे नोंदविण्यात आले असून १ हजार ४२ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत २३४ वाहनासह ७ कोटी ६३ लाख ३४ हजार २३१ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

राज्य उत्पादन शुल्कचे अंमलबजावणी व दक्षता सह आयुक्त प्रसाद सुर्वे व विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक चरणसिंह राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली आहे. या पथकांकडून जिल्ह्यातील सर्व हातभट्टी निर्मिती, वाहतूक, विक्री, तसेच धाबे, अवैध ताडी धंदे यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांत १ हजार ४२ वारस व ५८ बेवारस गुन्ह्यांचा समावेश आहे. एकूण बिअर ३ हजार ९५१ ब.लि., कॅप्स-३२, देशी दारू- ४ हजार ४९८ ब.लि. विदेशी दारू (राज्यातील)- ४ हजार ५२ ब.लि., विदेशी मद्य (परराज्यातील गोवा)- २३३ ब.लि, लेबल संख्या- १० हजार ९३० ब.लि., अवैद्य गावठी हातभट्टी दारू १ लाख १५ हजार ५६४, गावठी हातभट्टी दारू निर्मितीचे रसायन २ लाख ७९ हजार ३८० ब.लि, वाईन ४८५ ब.लि, ताडी ६ हजार २७५ लिटर व इतर ६२२ ब.लि तसेच २३४ वाहने असा एकूण ७ कोटी ६३ लाख ३४ हजार २३१ रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

उद्या २३ नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीची मतमोजणी होत असून या दिवशी सर्व विधानसभा मतदार संघांचे अधिकृत निकाल जाहीर होईपर्यंत कोरडा दिवस (ड्राय डे) घोषित करण्यात आला आहे. या दिवशी जिल्ह्यातील मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती बंद राहतील. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मद्य वाटप आदी संबंधी माहिती, तक्रार द्यावयाची असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ व राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग अधीक्षक कार्यालयाच्या ०२०-२६१२७३२१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विभागाचे अधीक्षक राजपूत यांनी केले आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने राज्यात सर्वाधिक ७ कोटी ६३ लाख ३४ हजार रुपयाहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

# अमोल कोल्हेंच्या हट्टापायी कलाटेंना उमेदवारी; चिंचवडमधील पराभव शरद पवारांच्या जिव्हारी लागणारा ; शंकर जगताप

## अमोल कोल्हे यांच्या हट्टपायी चिंचवड विधानसभा मतदारसंघात राहुल कलाटे यांना उमेदवारी देण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघामधून महायुतीचे उमेदवार शंकर जगताप हे विजयी झाले आहेत. विजयानंतर जगताप यांनी महायुतीच्या नेत्यांचे आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघांमधील कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत. केवळ अमोल कोल्हे यांच्या हट्टपायी चिंचवड विधानसभा मतदारसंघात राहुल कलाटे यांना उमेदवारी देण्यात आली त्यामुळे त्यांचा पराभव झाल्याचा आरोप शंकर जगताप यांनी केला आहे. शंकर जगताप हे प्रसार माध्यमांशी बोलत होते.



शंकर जगताप म्हणाले, हा विजय चिंचवड मतदारसंघातील जनतेचा आहे. हा विजय दिवंगत लक्ष्मण जगताप यांना समर्पित करतो. माझ्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी अपार कष्ट घेतले आहे. पुढे ते म्हणाले, आयत उमेदवार दिल्याने शरद पवारांच्या पक्षाला पराभव स्वीकारावा लागला आहे. अमोल कोल्हे यांच्या हट्टापायी चिंचवडमध्ये पराभव झाला आहे. हा पराभव शरद पवारांच्या जिव्हारी लागणारा आहे.

पुढे ते म्हणाले, शरद पवार यांच्यामुळे लाखाच्या घरात मते पडली अन्यथा कलाटे यांना ५० हजार मते पडली असती. पुढे ते म्हणाले, आगामी महानगर पालिका निवडणूक महायुती म्हणून आम्ही लढणार असून पुन्हा महानगर पालिकेवर महायुतीची सत्ता येईल. असा विश्वास ही जगताप यांनी व्यक्त केला आहे. मंत्री पदाबाबत शंकर जगताप यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली. चिंचवडमध्ये भाजप च्या कार्यकर्त्याला मंत्री पद मिळत असेल तर त्याच स्वागत करतो.


केवळ अमोल कोल्हे यांच्या हट्टपायी चिंचवड विधानसभा मतदारसंघात राहुल कलाटे यांना उमेदवारी देण्यात आली त्यामुळे त्यांचा पराभव झाल्याचा आरोप शंकर जगताप यांनी केला आहे. शंकर जगताप हे प्रसार माध्यमांशी बोलत होते.

# कुलसचिव पदभरती पुन्हा लांबणीवर

## अधिष्ठाता भरतीची जाहिरात पुढील आठवड्यात? खुला, ओबीसी, एससी आणि एनटी संवर्गातील उमेदवारांमधून निवड होणार

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठाता आणि प्रभारी कुलसचिव पदभरतीशी निगडीत अनेक प्रश्न काही अधिसभा सदस्यांकडून येत्या ३० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अधिसभेच्या उपस्थित केले जाण्याची शक्यता आहे.परंतु, विद्यापीठाकडून पुढील आठवड्यात पूर्णवेळ रिक्त असलेल्या चार अधिष्ठातापदाच्या भरतीसंदर्भातील जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असल्याचे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. मात्र, कुलसचिव पदभरती आणखी काही दिवस लांबणार आहे. त्यामुळे पूर्णवेळ कुलसचिव कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर पूर्णवेळ अधिष्ठाता यांचाही कार्यकाळ संपला. मात्र, त्यानंतर प्रभारी कुलगुरू म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या डॉ. कारभारी काळे यांनी प्रभारी अधिष्ठाता पदावर चार व्यक्तींची नियुक्ती केली. पुढे डॉ. सुरेश गोसावी यांनी पूर्णवेळ कुलगुरूपदाची जबाबदारी स्वीकारली. गोसावी यांच्या कार्यकाळात अधिष्ठाता भरतीची जाहिरात देण्यात आली होती. तसेच पात्र उमेदवारांकडून अर्जही स्वीकारण्यात आले. परंतु, या भरतीसाठी राज्य शासनाकडून आरक्षणाचा नियम लागू करण्यात आला. परिणामी संबंधित जाहिरात रद्द करण्यात आली.आता खुला संवर्ग, ओबीसी संवर्ग, एससी संवर्ग आणि एनटी संवर्गातील उमेदवारांमधून अधिष्ठाता पदाची निवड केली जाणार आहे.

राज्य शासनाकडून मंजूर झालेल्या आरक्षणानुसार आता विद्यापीठ प्रशासनातर्फे नव्याने जाहिरात प्रसिद्ध केली जाणार आहे. विधानसभा निवडणूकीची आचार संहिता लागू असल्याने विद्यापीठाला अधिष्ठातापदाची जाहिरात प्रसिद्ध करता आली नाही. मात्र, आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर पुढील आठवड्यात अधिष्ठाता भरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्याचे विद्यापीठाचे नियोजन असल्याचे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. तसेच येत्या ३० नोव्हेंबर पूर्वी जाहिरात प्रसिद्ध न झाल्यास अधिसभा सदस्यांच्या रोषाला सामोरे जावे लागणार असल्याचे बोलले जात आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रभारी अधिष्ठाता आणि प्रभारी कुलसचिव पदभरतीशी निगडीत अनेक प्रश्न काही अधिसभा सदस्यांकडून येत्या ३० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अधिसभेच्या उपस्थित केले जाण्याची शक्यता आहे.

### नवी वर्ष उजाडणार

» विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रभारी कुलसचिवपदी डॉ. विजय खरे यांची आणि त्यानंतर डॉ. ज्योती भाकरे यांची नियुक्ती करण्यात आली. काही महिन्यांपूर्वी पूर्णवेळ कुलसचिवपदाच्या नियुक्तीवरून निर्माण झालेल्या वादामुळे सर्व प्रकरण राज्यपाल कार्यालयाकडे पाठवण्यात आले आहे. राज्यपाल कार्यालयाकडून निर्देश प्राप्त झाल्यानंतरच कुलसचिव निवडीची पुढील प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिव आणि पूर्णवेळ अधिष्ठाता मिळण्यास नवीन वर्ष उजाडणार आहे, असेही विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

# मुलाची रणनीती अन् वडिलांचा विजय

## बापूसाहेब पठारे यांच्या विजयात सुरेंद्र पठारे किंगमेकर, राज्यभरासह पुणे अन् पश्चिम महाराष्ट्रात महायुती आणि भाजपचा झंझावात

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभरासह पुणे अन् पश्चिम महाराष्ट्रात महायुती आणि भाजपचा झंझावात असताना पुण्यात मात्र एका तरुणाने आपल्या रणनीतीच्या जोरावर वडिलांच्या गळ्यात विजयाची माळ घातली. वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार बापूसाहेब पठारे विजयी झाले. विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांचा ४७१० मतांच्या फरकाने पराभव झाला.





> हा विजय संपूर्ण वडगावशेरी मतदारसंघांच्या जनतेचा आहे. मतदारसंघातील जनतेच्या विकासासाठी सर्वोतोपरी कार्यशील राहणार आहे. इथल्या एकूण एक समस्यांवर ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवून त्या मार्गी लावणार. या लढाईत सोबत असलेल्या महाविकास आघाडीच्या प्रत्येकाचे आभार आहेत. ?
>
> **- बापूसाहेब तुकाराम पठारे, आमदार, वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ**

विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून पुण्यातील वडगावशेरी विधानसभा मतदारसंघ चर्चेत होता. महायुतीकडून ही जागा भाजपच्या जगदीश मुळीक यांना जाणार की विद्यमान आमदार सुनील टिंगरे हेच वडगाव शेरीचे आगामी उमेदवार असणार यावरून जोरदार चर्चा रंगली होती. अखेरीस सुनील टिंगरे यांनी पुन्हा उमेदवारी मिळवली आणि निवडणुकीच्या रिंगणात उतरले. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने अनुभवी उमेदवार असलेल्या बापूसाहेब पठारे यांना उमेदवारी दिली. आणि तेव्हापासून वडगावशेरीचा सामना अटीतटीचा होईल अशी शक्यता वर्तवली गेली. आणि प्रत्यक्षात झाले ही तसेच. मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर सुनील टिंगरे यांनी आघाडी घेतली होती. मात्र शेवटच्या टप्प्यात बापूसाहेब पठारे यांनी आघाडी मोडून काढत तब्बल ४७१० मतांच्या फरकाने विजय मिळवला.

दरम्यान स्थानिक असलेले बापूसाहेब पठारे माजी आमदार राहिले. सरपंच ते आमदार असा त्यांचा प्रवास राहिला. मात्र मागील काही वर्षे ते काही कारणास्तव राजकारणापासून लांब राहिले. वडगावशेरी २०१४ आणि २०१९ च्या निवडणूकीत भाजपचे जगदीश मुळीक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनिल टिंगरे यांनी विजय मिळवला होता. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणूकीत बापूसाहेब पठारे पुन्हा राजकारणात सक्रिय झाले. त्यांनी विधानसभेचे तिकीट मिळवलं आणि त्यात ते विजयी झाले.

विधानसभेच्या या लढाईत बापूसाहेब पठारे यांना मुलाची साथ लाभली ती म्हणजे मुलगा सुरेंद्र पठारे यांची. सुरेंद्र पठारे हे देखील मागील काही वर्षांपासून वडगावशेरीचा राजकारणात सक्रिय आहेत. या संपूर्ण परिसरात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. मतदारसंघातील प्रत्येक छोट्या मोठ्या कामात त्यांनी सहभाग घेत अडचणी सोडण्याचा प्रयत्न केला. प्रसंगी आंदोलने ही केली आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले.

गेल्या काही वर्षांपासून सुरेंद्र पठारे यांनी मतदार संघात आपला जनसंपर्क वाढवत कामाला सुरूवात केली. प्रत्येक गोष्टीत सहभागी होत त्यांनी मतदार संघातल्या अडचणी जाणून घेतल्या व सोबतच पर्यायाने त्या सोडविण्यासाठी लढा उभारला आणि आंदोलने केली. पुण्यातील सीईओपी महाविद्यालयातील गोल्ड मेडलिस्ट असलेल्या सुरेंद्र पठारे यांनी मागील काही वर्षात संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. दीड महिन्यांपासून ते पायाला भिंगरी लागल्यासारखी फिरत होते. आणि त्याचा परिणाम विजयात झाला. वडील बापूसाहेब पठारे यांच्या गळ्यात त्यांनी विजयाची माळ घातली.